# डॉ. सुधाकरराव कोरे

डॉ. सुधाकरराव कोरे यांचे अलीकडे दु:खद निधन झाले. कोरे घराण्याचा माझा संबंध तसा दुरूनच होता. तात्यासाहेबांपासून सर्वच सिनीयर कोरे मंडळी वारणानगरचे धुरीण, भारवाहू, आणि नेते होते. त्यामुळे त्यांच्याविषयी आदर व दुरून नमस्कार करणे एव्हढेच मला माहित होते. पण सुधाकररावांचा त्याला अपवाद मानावा लागेल. त्यांच्याशी माझा वैयक्तिक पातळीवर संबंध आला – तोही एकप्रकारचा "अपघातच" म्हणावा लागेल.

१९७८ मध्ये पुण्यातील इंडो-फ्रेन्च संस्थेमार्फत फ्रान्सची सहल आयोजित करण्यात आली व त्यात वारणानगरचे ४ लोक सामील झाले. त्यापैकी एक माझे वडील होते. या संस्थेने प्रवाशांची फ्रान्समध्ये राहण्या-हिंडण्याची सोय केली होती. पण स्वतःच्या खर्चाने व स्वतःच प्लॅनिंग करून इतर देश पाहण्याची मुभा सर्वांना होती. याचा फायदा घेऊन माझे वडील इंग्लंड व स्कॉटलंडला गेले. आज भारतीय लोक जगभर हिंडतात, इंटरनेटवर बसून स्वतःच सर्व बुकींगदेखील करतात, केसरी-वीणा वर्ल्डसारख्या कंपन्या सर्व सोयी करतात. तसे काहीही १९७८ मध्ये नव्हते. सेलफोनदेखील नव्हते. त्यामुळे कुणीतरी ओळखीचे असल्याशिवाय परदेशी जाणे हे महाकठीण काम होते.

डॉ. सुधाकरराव कोरे त्या काळात स्कॉटलंडमध्ये होते. शिक्षणासाठी व नंतर मेडिकल प्रॅक्टीससाठी ते तिथे तात्पुरते स्थायिक झाले होते. त्यांना जेव्हा या ट्रिपची बातमी लागली तेव्हा त्यांनी आपणहून वारणेच्या मंडळींना स्कॉटलंडचे आमंत्रण दिले व सर्व सोय करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळेच माझे वडील तिकडे जाऊ शकले.

त्यांच्या या अल्प सहवासात वडिलांना व नंतर त्यांनी आम्हाला वर्णन करून सांगितल्यामुळे आम्हालाही उमगलेले सुधाकरराव वेगळेच "कोरे" व्यक्तिमत्व आहेत असे जाणवले. संस्थांचे नेतृत्व करावे असा पिंड नसला तरी कला, शिक्षण, संस्कृती, जगप्रवास अशा इतर गोष्टींत सुधाकररावांना रस होता. वारणेच्या मुलांनी खूप शिकावे, बाहेर पडावे, जीवनाचा रस घ्यावा अशा विचारांचे ते होते.

नंतर लवकरच सुधाकरराव स्कॉटलंडला रामराम ठोकून वारणानगरला परत आले. बहुतेक १९७९-८० सालची गोष्ट असावी. नेतृत्व, राजकारण, संस्था चालवणे यात रस नसल्यामुळे त्यांनी मिरजेत “कोरे हॉस्पिटल” सुरू केले व स्वतःचा वैद्यकी व्यवसाय सुरू केला. आणि वर म्हटल्याप्रमाणे एका अपघातामुळेच माझी व त्यांची भेट झाली.

१९८१ मध्ये मी सांगलीत वालचंद कॉलेजमध्ये इंजिनियरींगच्या पहिल्या वर्षाला होतो. ९ वी - १० वीत असल्यापासून मला पोटदुखीचा विकार जडला होता. अचानक कळा  येऊन दुखू लागायचे, इतके की मी असह्य होऊन गडाबडा लोळू लागायचो. एक-दोन तास झाले की कळा थांबायच्या. अनेक चाचण्या झाल्या, उपाय झाले पण हा प्रकार काही थांबत नव्हता. १९८० मध्ये मिरजेत वानलेस हॉस्पिटलमध्ये जाऊन amoebiasis असेही निदान झाले व भरपूर गोळया खाऊन झाल्या. पण ही धूमकेतूसारखी अधुनमधून भेटणारी पोटदुखी काही गेली नाही. शेवटी १९८१ मध्ये मी काही दिवस सुटीला सांगलीहून वारणानगरला आलो असताना एका अमेरिकन मिशनरी डॉक्टरची (त्यांचे नाव Dr. Seaton होते) भेट माझ्या मित्राने – अतुल धनवडेने – घडवून आणली. हा डॉक्टर एक-दोन दिवसांसाठीच अतुलचे वडील डॉक्टर धनवडे यांना भेटायला आला होता. तर या गोऱ्या इसमाने माझ्या पोटदुखीचे अचूक निदान केले व सांगितले की “तुला अपेन्डिसायटीस आहे व तातडीने शस्त्रक्रियेची गरज आहे”. आम्ही लगेच सुधाकररावांना फोन लावला व त्यांचा सल्ला

मागितला. त्यांनी ताबडतोब सांगितले की “तू माझ्या हॉस्पिटलमध्ये भरती हो, शस्त्रक्रियेची तयारी मी करतो.”

नाईकसाहेबांनी नेहमीप्रमाणे लगेच मदतीचा हात पुढे केला व जीपने मिरजेला पोचवायची सोय केली. त्याच रात्री मी व माझे आईवडील मिरजेस रवाना झालो.

आश्वासन दिल्याप्रमाणे सुधाकररावांनी मला त्यांच्या चकचकीत, नव्या-कोऱ्या “कोरे हॉस्पिटल” मध्ये भरती केले व मिरजेतील शल्यविशारद डॉक्टर कुरणे यांच्याकरवी माझी शस्त्रक्रिया घडवून आणली. सगळे काही व्यवस्थित झाले व मी त्या जीवघेण्या पोटदुखीतून कायमचा मुक्त झालो. इतके की त्या दिवसापासून कोणाचे काही चांगले झाले तरी सहसा माझ्या पोटात दुखत नाही! 😊

या प्रसंगामुळे सुधाकरराव व माझ्यात चांगलीच जवळीक निर्माण झाली. पूर्वी ऐकलेले त्यांचे गुण – चतुरस्त्र व्यक्तिमत्व, कला-संगीत-साहित्याची आवड, बोलण्यात कमालीचे मार्दव – असे सर्व जवळून अनुभवण्यास मिळाले. नंतरही मी त्यांच्या संपर्कात राहिलो. जमेल तेव्हा त्यांना मिरजेस जाऊन भेटत राहिलो. त्यांच्या फॅमिलीशीही छान ओळख झाली. आमच्यात एक सुंदर कनेक्शन निर्माण झाले असे मी खात्रीने सांगू शकतो. अर्थात पुढे मी माझ्या आयुष्यात – नोकरी-धंदा, संसार, इत्यादी – गुरफटल्यावर दुर्दैवाने वारणेशीच संपर्क कमी झाला व त्यात सुधाकररावांशी संपर्क राहिला नाही. पण त्यांची बातमी मी काढत राहिलो. पारगावला डेंटल हॉस्पिटल सुरू केल्यावर मला वाटते मी त्यांना एक-दोनदा भेटलो देखील. पण आता भेटींचा तपशील आठवत नाही. त्यांचे उमदे, प्रसन्न व्यक्तिमत्व, हसरा चेहरा मात्र कायम लुभावत राहिला.

वारणानगर हा केवळ एक प्रयोग नसून ते एक मोठे पर्व होते. गेल्या शतकाच्या शेवटच्या चाळीस-पन्नास वर्षात जे लोक तिथे काही काळ का होईना राहिले, भेट देऊन गेले त्या सर्वांच्या आठवणीत आजन्म राहिल असे ते पर्व होते. आणि असे असण्याचे प्रमुख कारण म्हणजे त्या काळात तिथे वास्तव्य करून राहिलेल्या महाप्राय व्यक्ती. एकापाठोपाठ एक अशी उत्तुंग व्यक्तिमत्त्वे वारणानगरमध्ये त्या काळात होती, तिथला परिसर, तिथले लोक यांच्यावर कायमचा ठसा उमटवून गेली. त्यातलेच एक सुधाकरराव कोरे. त्यांचे माझ्यावरील ऋण अविस्मरणीय व कधीही न फिटण्यासारखे आहे.

त्यांच्या आत्म्यास प्रेमपूर्वक श्रद्धांजली.

अभय बिं. जोशी (abjoshi@yahoo.com)
२३ ऑगस्ट २०२०